“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2022-23 – PART 1

सकाळ
गुरुवार, २ जून २०२२

# शिक्षकांनी विद्यार्थी संपत्ती मानावी

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे; प्रभारी प्राचार्य ढेकळेंचा सेवागौरव समारंभ

इचलकरंजी, ता. १ : प्रभारी प्राचार्य असतानाही ढेकळे सरांनी गुणवत्तापूर्ण काम केले. विद्यार्थी ही संपत्ती मानून शिक्षकाने काम करायला हवे. सुसंस्कारित माणूसच कृतज्ञता व्यक्त करतो, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले. डीकेएएससी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या सेवागौरव समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य सुनील पाटील होते. स्वामी विवेकानंद



इचलकरंजी : डॉ. व्ही. एस. ढेकळे यांचा निवृत्तीनिमित्त सत्कार करताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सुनील पाटील, कौस्तुभ गावडे आदी.

शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री. गावडे यांनी गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी असल्याचे सांगून ढेकळे सरांकडून शिस्तीचे धडे गिरवल्याचे सांगितले. सत्काराला उत्तर देताना प्रभारी प्राचार्य डॉ. ढेकळे म्हणाले, 'माणूस म्हणून जगायला शिकवणाऱ्या संस्थेमध्ये काम करण्याची संधी मिळाली. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हेच माझे आदर्श असल्याचे सांगून संस्थेच्या कार्यकर्त्यांत बळ आणि प्रामाणिकपणा देणारे संस्थाप्रमुख लाभले.' डॉ. सुभाष इंगळे आणि डॉ. संदीप गावडे यांच्या 'वाईल्ड फ्लॉवर्स ऑफ व्हिसीनिटी ऑफ इचलकरंजी' या पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते केले. प्रभारी प्राचार्य डॉ. ढेकळे यांचा महाविद्यालयातर्फे सपत्नीक सत्कार केला. गौरव समारंभात डॉ. ए. डी. जाधव, प्राचार्य जी. पी. माळी, प्राचार्य एच. बी. पाटील, प्रा. लड्डे, प्रा. राजू खोत, बी. डी. पाटील, उदित ढेकळे, प्रा. व्ही. पी. पाटील, सौ. रत्नप्रभा ढेकळे आदींनी मनोगत व्यक्त केले.

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
४ जून २०२२/५

# प्राचार्यपदी डॉ. अनिल पाटील

**इचलकरंजी** : येथील डिकेएएससी कॉलेजच्या प्राचार्यपदी प्राचार्य डॉ. अनिल पाटील हे रुजू झाले.त्यांनी यापूर्वी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये जत, कापशी, मिरज आणि कन्या महाविद्यालय, इचलकरंजी या शाखांवर प्राचार्य म्हणून काम केले आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक वर्ग यांच्याकडून त्यांचे स्वागत केले आणि शुभेच्छा देण्यात आल्या.

Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
६ जून २०२२

# डीकेएएससी प्राचार्यपदी डॉ. पाटील

**इचलकरंजी, ता. ५ :** येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्राचार्य डॉ. अनिल पाटील हे रुजू झाले आहेत. प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. सी. ढेकळे हे निवृत्त झाले. त्यांच्या जागी प्राचार्य डॉ. पाटील यांची नियुक्ती केली. स्वामी विवेकानंद संस्थेत १८ वर्षे नेतृत्वाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे. सध्या ते इचलकरंजीतील आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत होते. तसेच यापूर्वी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण



अनिल पाटील

संस्थेमध्ये जत, कापशी, मिरज आदी शाखांवर प्राचार्य म्हणून काम केले आहे. आता शहरातील सर्वांत मोठ्या वरिष्ठ महाविद्यालयाची जबाबदारीची सूत्रे प्राचार्य त्यांनी स्वीकारली. कन्या महाविद्यालयाच्या रिक्त प्राचार्यपदी प्रा. डॉ. त्रिशला कदम यांना संधी दिली असून, त्यांची प्रभारी प्राचार्य म्हणून नियुक्ती केली आहे.

CS Scanned with CamScanner

सकाळ » TODAY
मंगळवार, ७ जून २०२२ ३

**डीकेएएससी महाविद्यालय**

इतिहास विभाग व एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवराज्याभिषेक दिनात विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. अरुण कटकोळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. डॉ. सुनीता वेल्हाळ, प्रा. डी. जे. मुंगारे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ९ जून २०२२



इचलकरंजी : 'डीकेएएससी' महाविद्यालयात आयोजित स्पोकन इंग्लिश कोर्स व विविध स्पर्धांतील सहभागींना प्रमाणपत्र व पारितोषिके देण्यात आली.

## विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण

इचलकरंजी : 'डीकेएएससी' महाविद्यालयात करिअर ओरिएंटेड कोर्स इन स्पोकन इंग्लिश कोर्स; तसेच विविध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे व पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. इंग्रजी विभागातर्फे स्पर्धेचे आयोजन केले होते. प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण कॉलेज कोल्हापूरचे इंग्रजी विभागप्रमुख प्रा. पी. डी. तोरस्कर उपस्थित होते. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवण्याबाबत मार्गदर्शन करत आधुनिक युगात इंग्रजीचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. अध्यक्षस्थानी भूगोल विभागप्रमुख डॉ. डी. सी. कांबळे होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रस्तावना करून पाहुण्यांचे स्वागत इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी केले. डॉ. डी. जी. घोडके यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सृष्टी मसाई आणि पूजा ढंगे यांनी सूत्रसंचालन केले. संध्या माने हिने आभार मानले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. डॉ. डी. जी. घोडके, प्रा. संदीप हरगाणे, प्रा. मंगेश चेंडके, प्रा. नम्रता ताटे, प्रा. श्रद्धा बरगाले आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार, १० जून २०२२

# महाराष्ट्राच्या जडणघडणीत डॉ. बापूजी साळुंखेंचे योगदान

## संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांचे प्रतिपादन : संस्थेत डॉ. बापुजी साळुंखे जयंतीदिनी व्याख्यान

प्रतिनिधी
कोल्हापूर

संतांची जीवनमूल्ये आत्मसात करून बापूजींनी शिक्षणक्षेत्रात उत्तुंग कार्य केले आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण राज्याच्या खेडोपाड्यातील सर्वसामान्य कुटुंबापर्यंत पोहोचवले. म्हणूनच शिक्षणकर्मी म्हणजे डॉ. बापूजी साळुंखे अशी त्यांची ओळख आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीत बापूजींचे महत्वाचे योगदान आहे,असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त गुरूवारी ताराबाई पार्क येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. 'डॉ. बापूजी साळुंखे शिक्षण व संत साहित्य' यावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. याप्रसंगी संस्थेच्या विविध शाखांमधील कला शिक्षकांच्या चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते केले. प्रतिमा पूजनानंतर महेश हिरेमठ यांनी संस्थेची प्रार्थना सादर केली.



कोल्हापूर : डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीदिनी बोलताना डॉ. रामचंद्र देखणे. सोबत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, डॉ. एस. एम. गवळी.

डॉ. देखणे म्हणाले, ज्ञानी माणूस सुखी, बलवान,सामर्थ्यवान होऊ शकतो. ज्ञान ही एकमेव गोष्ट जगात तुम्हाला तुमची ओळख निर्माण करून देईल. बापूजींनी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार देऊन समाजाला सजग केल्याचे सांगितले.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, बापूजींनी आयुष्यात सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग यासह अन्य मूल्ये जपत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. संत परंपरेचा बापूजींवर प्रभाव होता. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांची साधना करत चारित्र्याची कास धरणारे गुरुदेव कार्यकर्ते आणि विद्यार्थी निर्माण करण्याचा सेवाभाव बापूजींनी आयुष्यभर जपला.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. आर व्ही. शेजवळ यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्या शुभांगी गावडे यांनी स्वागत केले. बारावी परीक्षेतील गुणवंतांना गौरवण्यात आले. डॉ. महेश गायकवाड, डॉ. कविता तिवडे यांनी सूत्रसंचालन केले. सहसचिव डॉ. एस. एम. गवळी यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विभागप्रमुख श्रीराम साळुंखे उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
१३ जून २०२२

## डीकेएएससी

इचलकरंजी : येथील डीकेएएससी कॉलेजचा बारावीचा निकाल ८२.३० टक्के लागला. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. सायन्स विभागाचा निकाल ९६.९५ टक्के, आर्टस् विभाग ६४.६७ तर कॉमर्स विभागाचा ७९.७४ टक्के लागला. तिन्हीही विभागांचे अनुक्रमे गुणवत्ताधारक विद्यार्थी असे : सायन्स विभाग- समीक्षा पाटील (८७.३३ टक्के), श्रेया पाटील (७८.०० ), सोहम मोहिते (७८.००), अवंतिका भोसले (७६.५० टक्के). कॉमर्स विभाग- राखी हुरकत (८५.३३ ), पारस जैन (८५.१३ ), नयन जैन (८४.६७), आर्टस् विभाग - श्रावणी करंबेळकर (७८.३३ ), करण माने (७८.००), स्वप्नाली कांबळे (७६.१७).

Scanned with CamScanner

कोल्हापूर

दक्षिण महाराष्ट्र
केसरी

१४ जून २०२२/५

# बारावी गुणवत्ताधारकांचे अभिनंदन

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी कॉलेजचा बारावीचा निकाल ८२.३० टक्के लागला. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले. तिन्हीही विभागांचे गुणवत्ताधारक विद्यार्थी पुढीलप्रमाणे : सायन्स विभाग–समीक्षा पाटील(८७.३३ टक्के), श्रेया पाटील (७८.०० टक्के), सोहम मोहिते (७८.०० टक्के), अवंतिका भोसले(७६.५० टक्के). कॉमर्स विभाग –राखी हुरकत (८५.३३ टक्के), पारस जैन (८५.१३ टक्के), नयन जैन (८४.६७ टक्के), आर्टस विभाग–श्रावणी करंबेळकर (७८.३३ टक्के), करण माने (७८.०० टक्के), स्वप्नाली कांबळे ( ७६.१७ टक्के) विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये महाविद्यालयाच्या तिन्हीही विभागातील प्राध्यापकांचा मोठा वाटा आहे.

Scanned with CamScanner

सकाळ

शनिवार,
१८ जून २०२२



इचलकरंजी : खेलो इंडिया स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावल्याबद्दल अनिकेत माने यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील.

## अनिकेत मानेचा सत्कार

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाचा खेळाडू अनिकेत माने याने खेलो इंडिया स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावले. हरियाणातील पंचकूला येथे झालेल्या चौथ्या खेलो इंडिया यूथ गेम्स राष्ट्रीय मैदानी क्रीडा स्पर्धेत त्याने उंच उडी स्पर्धेमध्ये नवीन विक्रम केला. २.७ मीटर उंच उडी मारून सुवर्णपदक प्राप्त केले आहे. गुजरातमधील नंदीयाड येथे २.६ मीटर उंचउडी मारून थोडक्यात त्याचे सुवर्णपदक हुकले होते. तोच विक्रम मोडीत काढून खेलो इंडिया यूथ स्पर्धेमध्ये त्याने २.७ मीटरं इतकी उंच उडी मारून सुवर्णपदक मिळवून एक सेंटिमीटरने स्वतःचा विक्रम तयार केला आहे. त्याने महाराष्ट्राला ॲथलेटिक्स खेलो इंडिया स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवून दिले आणि महाविद्यालयाचा झेंडा अटकेपार लावला. अनिकेत हा बेंगलोर येथे भारतीय ऑलिम्पिकची खेळाडू सहाना कुमारी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. त्याचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते सत्कार केला. प्रा. मेजर मोहन विरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे व वडील सुभाष माने यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
२० जून २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील एनसीसी कॅडेट योगाचा सराव करत आहेत.

# एनसीसी कॅडेटकडून योगाचा सराव

**इचलकरंजी :** आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील एनसीसी कॅडेट योगाचा सराव सुरू केला आहे. डीकेएएससी महाविद्यालयाच्या प्रांगणात शहरातील विविध शाळा, महाविद्यालयातील कॅडेट दैनंदिन प्रशिक्षण घेत आहेत. यामध्ये डीकेएएससी महाविद्यालय, गोविंदराव हायस्कूल, डॉ. बापूजी साळुंखे हायस्कूल यांचा समावेश आहे. २१ जूनला शहरात मोठ्या प्रमाणात योग दिन साजरा करण्यात येतो. हे एनसीसी कॅडेट अनेक ठिकाणी योग दिनाच्या पार्श्वभूमीवर योग दिनाला प्रमुख भूमिका बजावतात. प्रशिक्षक म्हणून सुहास पोवळे, सानिका जाधव, प्रज्ञा गायकवाड काम पाहत आहेत. यासाठी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, महाराष्ट्र बटालियन एनसीसी कोल्हापूरचे कर्नल डी. एस. सायना, कर्नल वैजनाथ थोरात, मेजर मोहन विरकर आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
बुधवार,
२२ जून २०२२

# योग दिन

## डीकेएएससी महाविद्यालय

कोल्हापूर जिल्हा गुरुप्रसाद योग परिषदेच्या सहकार्याने शहरातील विविध एनसीसी बटालियनच्या संयुक्त विद्यमाने योग दिन झाला. योगाबाबत योग प्रशिक्षक सुहास पोवळे यांनी मार्गदर्शन केले. यात गोविंदराव हायस्कूलचे एनसीसी विद्यार्थी सहभागी झाले होते. खेलो इंडिया स्पर्धेतील सहभागी खेळाडूंचा सत्कार झाला. तसेच वयोगटानुसार आयोजित केलेल्या योग स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचा सत्कार रोटरी क्लबतर्फे करण्यात आला. मेजर मोहन वीरकर, प्रा. अरुण कटकोळे, प्रशांत कांबळे, राहुल पोटे, पांडुरंग मेटे, विजय हावळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार, २७ जून २०२२



इचलकरंजी : कौस्तुभ गावडे यांनी डीकेएएससी महाविद्यालयास भेट दिली.

## कौस्तुभ गावडेंची 'डीकेएएसी'ला भेट

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी डीकेएएससी महाविद्यालयास भेट दिली. यामध्ये त्यांनी नूतन महाविद्यालयाच्या नूतन इमारतीची पाहणी केली. शैक्षणिक अडीअडचणी समजावून घेतल्या. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. त्यांच्यासमवेत संस्थेचे आजीव सेवक बी. एस. कुंभार, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. प्रा. मेजर मोहन विरकर, अधीक्षक सुनील महाडिक आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

लोकमत

epaper.lokmat.com

कोल्हापूर, मंगळवार, दि. २८ जून २०२२ ३

# कौस्तुभ गावडे यांची 'डीकेएएसी' ला भेट

इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयास श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी भेट दिली. त्यांनी महाविद्यालयाच्या नूतन इमारतीची पाहणी करून शैक्षणिक अडीअडचणी समजावून घेतल्या. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी स्वागत केले. यावेळी बी.एस.कुंभार, आर. आर. कुंभार, प्रा. मोहन वीरकर, सुनील महाडिक उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार,
८ जुलै २०२२



इचलकरंजी : प्रा. मेजर मोहन वीरकर यांना जीवनकेसरी या उपाधीने सन्मानित करताना हिंदकेसरी दीनानाथ सिंह, सुनील पाटील आदी.

# मोहन वीरकर यांचा सन्मान

सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. ७ : येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील प्रा. मेजर मोहन वीरकर यांना हिंदकेसरी दीनानाथ सिंह यांच्या हस्ते जीवनकेसरी या उपाधीने सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाचे आजी-माजी एनसीसी कॅडेट, खेळाडू आणि विद्यार्थ्यांतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सन्मती सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रा. मेजर वीरकर यांच्या जीवनकार्यावर आधारित 'जीवनकेसरी' या माहितीपटाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले.

प्रा. वीरकर यांनी विद्यार्थ्यांना घडविले, त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले. म्हणूनच कृतज्ञतापूर्वक सर्व आजी-माजी विद्यार्थी यांच्यातर्फे प्रा. वीरकर यांना जीवनकेसरी या उपाधीने सन्मानित केले. हिंदकेसरी सिंह यांनी आपल्या मनोगतातून वीरकर यांचे कौतुक केले. सुनील पाटील यांनी वीरकर यांच्या कार्याचा आढावा घेतला.

आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षक उत्तमराव पाटील, प्रा. मेजर एम. जी. गायकवाड, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपमहाराष्ट्र केसरी अमृत भोसले, दशरथ माने, प्रा. एम. एम. कांबळे, माजी नगरसेवक उदयसिंग पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. दत्ताभाऊ अळगीकर, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, विद्यार्थी, शिक्षक, खेळाडू उपस्थित होते. अरुण काशीद यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. रोहित शिंगे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संतोष कुंडले यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
२५ जुलै २०२२

# माजी विद्यार्थी मेळावा गुरुवारी

इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा आणि माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार माजी विद्यार्थ्यांतर्फे आयोजित केला आहे. महाविद्यालयाच्या माध्यमातून घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करीत आहेत. अशा उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार व माजी विद्यार्थी मेळावा होईल. गुरुवारी (ता. २८) सकाळी अकराला महाविद्यालयाच्या सभागृहात हा मेळावा होणार आहे. मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन माजी विद्यार्थी संयोजन समितीने केले.

Scanned with CamScanner

तरुण भारत

सोमवार, २५ जुलै २०२२

# एएससी कॉलेजमध्ये गुरुवारी माजी विद्यार्थी मेळावा

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयामध्ये गुरुवार २८ रोजी सकाळी ११ ते १२.३० माजी विद्यार्थी मेळावा आणि माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित केला आहे. या महाविद्यालयाच्या माध्यमातून घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत. अशाच विविध ठिकाणी आणि क्षेत्रात काम करत असलेल्या आणि नुकतेच उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार माजी विद्यार्थ्यांच्यावतीने महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित केला आहे. मेळाव्यास मान्यवर व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. तरी मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन अरुण काशीद, रोहित शिंगे, जेम्स बारदेसकर, प्रकाश जगताप, ऋषिकेश कुडाळकर, ऋषिकेश राऊत या संयोजकांनी केले आहे.

Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार, २९ जुलै २०२२

# डीकेएएससी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

इचलकरंजी, ता. २८ : सक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक जबाबदार असतो. सध्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावनेला मॅनेजमेंट करणारे मानसिक शिक्षण गरजेचे बनले आहे. अशावेळी विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनवण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे. माजी विद्यार्थ्यांनी आजी विद्यार्थ्यांसाठी केलेल्या योगदानातून महाविद्यालयाची उंची वाढते, असे मत शिवाजीनगरचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी व्यक्त केले.

डीकेएएससी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक शशांक बावचकर होते. महाविद्यालयाच्या भरभराटीत माजी विद्यार्थ्यांचे महत्त्व मोठे असते.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्यात माजी विद्यार्थी विजय राजापुरे यांची इचलकरंजी महानगरपालिकेच्या नगरसचिवपदी नियुक्ती झाल्याबद्दल गौरव करताना महादेव वाघमोडे, शशांक बावचकर, प्राचार्य डॉ. अनिल पाटील आदी.

पुढील काळात महाविद्यालयाला घडवण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग गरजेचा असल्याचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सांगितले. माजी विद्यार्थ्यांतर्फे गुणवंत व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव प्रमुख मान्यवरांच्या हस्ते केला. यामध्ये पोलिस उपनिरीक्षकपदी नियुक्तीबद्दल करिश्मा शेख, महानगरपालिकेच्या नगरसचिवपदी निवड झालेले विजय राजापुरे, भाई माधवराव बागल पुरस्कार प्राप्त प्रसाद कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक निवडीबद्दल सुहास पवळे, लष्करात निवड झालेले ओंकार माने यासह अविनाश सूर्यवंशी, पोलिस सागर हारगुले, सुनील पाटील या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान केला. स्वागत प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी केले.

रोहित शिंगे यांनी प्रास्ताविक केले. उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. आभार अरुण काशीद यांनी मानले. सूत्रसंचालन आतिष पाटील यांनी केले. माजी विद्यार्थी संघटनेचे राजन मुठाणे, प्रा. एम. एम. कांबळे, प्रकाश जगताप, प्रा. व्ही. बी. पाटील, दशरथ माने, प्रा. डी. ए. यादव, प्रा. डॉ. डी. जी. घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. मेळाव्यास महाविद्यालयाच्या ५९ वर्षांतील माजी विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार, २९ जुलै २०२२

# सक्षम विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक घटकाची जबाबदारी

## पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे : डीकेएएससी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

प्रतिनिधी
इचलकरंजी

सक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक जबाबदार असतो. सध्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावनेला मॅनेजमेंट करणारे मानसिक शिक्षण गरजेचे बनले आहे. अशावेळी विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनविण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे. माजी विद्यार्थ्यांनी आजी विद्यार्थ्यांसाठी केलेल्या योगदानातून महाविद्यालयाची उंची वाढते, असे प्रतिपादन शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी येथे केले. डीकेएएससी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक शशांक बावचकर होते.



इचलकरंजी : विजय राजापुरे यांची महापालिकेच्या नगरसचिवपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, शशांक बावचकर, प्रसाद कुलकर्णी, प्राचार्य अनिल पाटील.

महाविद्यालयाच्या भरभराटीत माजी विद्यार्थ्यांचे महत्त्व मोठे असते. पुढील काळात महाविद्यालयाला घडविण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग गरजेचा असल्याचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सांगितले. गुणवंत व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक करिश्मा शेख, महानगरपालिकेचे नगरसचिव विजय राजापूरे, माई माधवराव बागल पुरस्कारप्राप्त प्रसाद कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक सुहास पवळे, सैन्य दलातील ओंकार माने, मंडल अधिकारी अविनाश सूर्यवंशी, पोलीस सागर हारगुले, सुनिल पाटील यांचा सन्मान करण्यात आला.

स्वागत प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी केले. प्रास्ताविक रोहित शिंगे यांनी केले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी माजी विद्यार्थी संघटनेचे राजन मुठाणे, प्रा. एम. एम. कांबळे, प्रकाश जगताप, प्रा. व्ही. बी. पाटील, दशरथ माने, प्रा. डी. ए. यादव, प्रा. डॉ. डी. जी. घोडके, युवराज शिंगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यास ५९ वर्षातील माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन आतीष पाटील यांनी केले. आभार अरूण काशीद यांनी मानले.

Scanned with CamScanner

शनिवार ३० जुलै २०२२ | २

जागृत लोकनेता

# विद्यार्थ्यांच्या भावनेला मॅनेजमेंट करणारे मानसिक शिक्षण गरजेचे : पो.नि. महादेव वाघमोडे

इचलकरंजी/ प्रतिनिधी

सध्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावनेला मॅनेजमेंट करणारे मानसिक शिक्षण गरजेचे बनले आहे. अशावेळी विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनविण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग महत्वाचा ठरणार आहे, असे प्रतिपादन शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे निरिक्षक महादेव वाघमोडे यांनी केले. डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक शशांक बावचकर होते.



श्री. वाघमोडे म्हणाले, सक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक जबाबदार असतो. माजी विद्यार्थ्यांनी आजी विद्यार्थ्यांसाठी केलेल्या योगदानातून महाविद्यालयाची उंची वाढते. महाविद्यालयाच्या भरभराटीत माजी विद्यार्थ्यांचे महत्व मोठे असते. पुढील काळात महाविद्यालयांला घडविण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग गरजेचा असल्याचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सांगितले. अध्यक्षस्थानावरुन बोलताना शशांक बावचकर म्हणाले, इचलकरंजी शहर व परिसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी बापूजींनी ही संस्था उभी केली. जगामध्ये विविध क्षेत्रात येथील विद्यार्थी कार्यरत आहेत. त्यांच्या सहभागातून महाविद्यालयाचा विकास करता येईल.यावेळी माजी विद्यार्थ्यांतर्फे गुणवंत व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल पीएसआय करिश्मा शेख, महानगरपालिकेचे नगरसचिव विजय राजापूरे, भाई माधवराव बागल पुरस्कार प्राप्त प्रसाद कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक सुहास पवळे, लष्करात निवड झालेले ओंकार माने, निर्माते अविनाश सुर्यवंशी, पोलिस सागर हारगुले व सुनिल पाटील या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

स्वागत प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी केले. आजी-माजी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी महाविद्यालय एक पुल आहे. किंतू परंतू बाजुला ठेवून महाविद्यालयासाठी येत्या काळात माजी विद्यार्थ्यांनी एक खंबीर व्यासपीठ उभे करावे लागणार आहे. त्यासाठी माजी विद्यार्थ्यांच्या सहभागाची मुठ बांधावी लागेल, असे रोहित शिंगे यांनी प्रास्ताविकेत सांगितले.माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष राजन मुठाणे, प्रा. एम. एम. कांबळे, प्रकाश जगताप, प्रा. व्ही. बी. पाटील, दशरथ माने यांनी मनोगते व्यक्त केली. आभार अरूण काशीद यांनी मानले. सुत्रसंचालन आतिष पाटील यांनी केले. यावेळी आनंदा दोपारे, के. के. कांबळे, संजय सातपुते, वसंत सपकाळ, प्रा. डी. ए. यादव, प्रा. डॉ. डी. जी. घोडके यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्यास महाविद्यालयाच्या गेल्या ५९ वर्षातील माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with CamScanner

दै. युवकांचा
नवा महाराष्ट्र
शनिवार,
दि. ३० जुलै २०२२

# विद्यार्थ्यांच्या भावनेला मॅनेजमेंट करणारे मानसिक शिक्षण गरजेचे - वाघमोडे

इचलकरंजी : प्रतिनिधी–

सध्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावनेला मॅनेजमेंट करणारे मानसिक शिक्षण गरजेचे बनले आहे, असे प्रतिपादन पोलीस निरिक्षक महादेव वाघमोडे यांनी केले. डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक शशांक बावचकर होते.

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक जबाबदार असतो. माजी विद्यार्थ्यांनी आजी विद्यार्थ्यांसाठी केलेल्या योगदानातून महाविद्यालयाची उंची वाढते. महाविद्यालयाच्या भरभराटीत माजी विद्यार्थ्यांचे महत्व मोठे असते. भविष्यात महाविद्यालयाला घडवण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग गरजेचा असल्याचे सांगितले. शशांक बावचकर यांनी



शहर परिसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी बापूजींनी ही संस्था उभी केली. जगामध्ये विविध क्षेत्रात येथील विद्यार्थी कार्यरत आहेत. यावेळी माजी विद्यार्थ्यांतर्फे पीएसआय करिश्मा शेख, महापालिकेचे नगरसचिव विजय राजापूरे, प्रसाद कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक सुहास पवळे, लष्करात निवड झालेले ओंकार माने, अविनाश सुर्यवंशी, पोलीस सागर हारगुले व सुनिल पाटील या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. रोहित शिंगे यांनी महाविद्यालयासाठी येत्या काळात माजी विद्यार्थ्यांनी एक खंबीर व्यासपीठ उभे करण्यासाठी मुठ बांधण्याचे आवाहन केले. यावेळी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष राजन मुठाणे, प्रा. एम.एम. कांबळे, प्रकाश जगताप, प्रा. व्ही.बी. पाटील, दशरथ माने यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास प्रा. मेजर मोहन वीरकर, अरूण काशीद, आनंदा दोपारे, के.के. कांबळे, संजय सातपुते, वसंत सपकाळ यांच्यासह महाविद्यालयाचे ५९ वर्षातील माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
८ ऑगस्ट २०२२




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात मार्गदर्शन कार्यक्रमात बोलताना विकास आडसूळ.

# 'डीकेएएससी'मध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात ज्युनिअर विभागाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रम झाला. शैक्षणिक जीवनात येणाऱ्या टप्प्यांची जाणीव करून देत अकरावी व बारावी दोन वर्षे जीवनात महत्वाची असल्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विकास आडसूळ यांनी सांगितले. माजी विद्यार्थी सुरज कवळीकट्टी यांनी लव अँण्ड लाईफ या विषयावर मार्गदर्शन केले. लव आणि लाईफचा अनुभव घेताना ध्येय न विसरता होणाऱ्या चुकांकडे लक्ष द्या, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. मोहन वीरकर यांनी केले. सूत्रसंचालन व्ही. एस. कुलकर्णी यांनी केले.

Scanned with CamScanner

सकाळ
मंगळवार,
९ ऑगस्ट २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिवादन केले.

# डीकेएएससी महाविद्यालयात डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिवादन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिवादन केले. डॉ. बापूजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. उपस्थित गुरुदेव कार्यकर्त्यांनी डॉ. बापूजी यांच्या जीवन कार्याला उजाळा दिला. प्रा. डी. ए. यादव, प्रा. मेजर मोहन वीरकर, डॉ. डी. जी. घोडके, प्रा. डी. जे. मुंगारे, प्रा. घारे, प्रा. डॉ. सौ. पद्मश्री वाघमारे, प्रा. डॉ. सौ. सुनीता वेल्हाळ आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

पुण्य नगरी ■ मंगळवार, ९ ऑगस्ट २०२२

# शैक्षणिक धोरणातील आव्हाने स्वीकारण्यासाठी सकारात्मक दृष्टी हवी

## डॉ. डी. टी. शिर्के : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना ३५ व्या स्मृतिदिनी अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील आव्हानांना स्वीकारण्यासाठी सकारात्मक दृष्टीची आवश्यकता आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवताना शिक्षक सजग असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३५ व्या स्मृतिदिनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून 'भविष्यातील शिक्षण : संधी आणि आव्हाने' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३५ व्या स्मृतिदिनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे आदी.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी सुमारे पाच दशकांपूर्वी उभ्या केलेल्या शैक्षणिक तत्त्वज्ञानामध्ये नव्या शैक्षणिक धोरणाची बीजे रोवली गेली आहेत. त्यामुळेच श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सुसंस्कारी नागरिक घडवण्याचे कार्य अव्याहतपणे सुरू आहे.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी संघर्षातून बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. शिक्षण यज्ञात बापूजींनी ६९ वर्षे अव्याहतपणे कार्य केले. या स्मृतिदिनानिमित्ताने आजच्या शिक्षकांनी बापूजींच्या विचार व कार्याचा वारसा आत्मसात करून विद्यार्थी घडवावेत व संस्थेचा नावलौकिक वाढवावा.

याप्रसंगी संस्थेतील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, प्रतिमा पूजन, संस्था प्रार्थना व महेश हिरेमठ आणि सहकाऱ्यांच्या गायनाने झाली. प्रास्ताविक संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी केले. आभार संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्र. प्राचार्य डॉ. महेश गायकवाड आणि प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सहसचिव (अर्थ) एस. एम. गवळी, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, श्रीराम साळुंखे, संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी व संस्थेच्या १३ जिल्ह्यांतील ४०७ शाखांतील गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते. दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

Scanned with CamScanner




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयामध्ये मार्गदर्शन करताना डॉ. ए. पी. जाधव.

# डॉ. ए. पी. जाधव यांचे व्याख्यानातून मार्गदर्शन

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयामध्ये आजादी का अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत 'भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक पार्श्वभूमी' या विषयावर समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. पी. जाधव यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. डी. सी. कांबळे उपस्थित होते. डॉ. ए.पी.जाधव म्हणाले, शिक्षणामुळे राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. तसेच आधुनिक शिक्षणामुळे एकीची भावना निर्माण झाली. सामूहिक हितासाठी स्वातंत्र्य चळवळीत अनेकांनी सहभाग घेतला. स्वतंत्र भारताच्या विकासात सर्वच घटकांचे योगदान आहे. प्रास्ताविक प्रा. (डॉ.) एकनाथ आळवेकर यांनी केले तर आभार प्रा. ए. एस. कटकोळे यांनी मानले. याप्रसंगी डॉ. डी.जी.घोडके, डॉ.एस.जे.वेल्हाळ, प्रा. विशाल कांबळे, डॉ. रॉड्रिक्स तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

केसरी

9921600800

13-8-2022

सकाळ बुधवार, १७ ऑगस्ट २०२२

# स्वातंत्र्यदिनी देशभक्तीचा जागर

**● डीकेएएससी महाविद्यालय**

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. एनएनसी विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिली. आजादी का अमृतमहोत्सव हे देशप्रेम जागृत करणारे पथनाट्य एनएनसी विद्यार्थ्यांनी सादर केले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शहरातील महापालिका तसेच विविध उपक्रमात सहभाग घेतला. प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. डी. ए. यादव, प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डॉ. एकनाथ आवळेकर, डॉ. डी. जी. घोडके आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
२२ ऑगस्ट २०२२



जांभळी : येथील ऑक्सिजन पार्कवर डीकेएएससी महाविद्यालयाच्या एनसीसी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले.

## डीकेएएससी महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण

इचलकरंजी : जांभळी (ता. शिरोळ) येथील ऑक्सिजन पार्कवर डीकेएएससी महाविद्यालयाच्या एनसीसी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. पार्कवर पश्चिम घाटात दुर्मिळ होत चाललेल्या काटेसावर झाडाचे संवर्धन केले. काटेसावरच्या ३५ झाडांचे वृक्षारोपण केले. एनसीसी विद्यार्थ्यांनी हे वृक्षारोपण करून मोठ्या प्रमाणात काटेसावरचे जतन करण्याचा प्रयत्न केला आहे. कर्नल डी. एस. सायना, कर्नल वैजनाथ थोरात, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला. एनएनसी विभागप्रमुख मेजर मोहन वीरकर, दशरथ माने, प्रा. प्रशांत कांबळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार,
२३ ऑगस्ट २०२२

# ए.एस.सी. महाविद्यालयास मदत



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम ए. एस. सी. महाविद्यालयास माजी विद्यार्थी दशरथ माने यांच्याकडून आर्थिक मदत प्रदान केली.

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम ए. एस. सी. महाविद्यालयास माजी विद्यार्थी दशरथ माने यांच्याकडून आर्थिक मदत प्रदान केली. माने यांनी महाविद्यालयात एक वर्ग खोली बांधून देण्याचे घोषित केले आहे. त्याची प्राथमिक सुरवात म्हणून त्यांनी आज महाविद्यालयास ५१ हजार रुपयांचा धनादेश माजी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्याकडे सुपूर्द केला. योगदानाबद्दल स्वामी विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार, २९ ऑगस्ट २०२२

# ‘नवे शिक्षण धोरण’वर डीकेएएससीमध्ये कार्यशाळा

प्रतिनिधी
इचलकरंजी

भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविण्याच्या उद्दिष्टाने लागू केलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आदर्श असेच आहे. या धोरणात उच्च शिक्षणावर मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे. तथापि, हे धोरण आखत असताना उच्च शिक्षणातील सद्यस्थिती आणि समस्यांचा सखोल विचार व्हायला हवा होता, असे मत शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी व्यक्त केले.

येथील डीकेएएससी कॉलेज येथे नवे शिक्षण धोरण विषयावर विद्यापीठस्तरीय कार्यशाळा झाली. महाविद्यालयाची याबाबतची समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : महाविद्यालये व शिक्षकांपुढील आव्हाने यावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ.अनिल पाटील म्हणाले, नवे शिक्षण धोरण लागू झाले असून आता त्याच्या अंमलबजावणीशिवाय दुसरा पर्याय नाही.




इचलकरंजी : राष्ट्रीय शिक्षण धोरण कार्यशाळेत बोलताना डॉ. बी. एम. हिर्डेकर, व्यासपीठावर प्र. प्राचार्या त्रिशला कदम व मान्यवर.

प्रास्ताविक संयोजक प्रा. डॉ. अर्जुन जाधव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. अक्षय स्वामी यांनी करून दिला. श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या त्रिशला कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेस महाविद्यालयाच्या सकाळच्या सत्राचे प्रमुख प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, दुपारच्या सत्राचे प्रमुख प्रा. डी. ए. यादव यांचे योगदान लाभले.

कार्यशाळेस प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी – विद्यार्थिनी सहभागी झाले होते. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी शुभांगी गावडे, सहसचिव प्रशासन डॉ. आर. व्ही. शेजवळ, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. आभार अंतर्गत हमी कक्ष समन्वयक डॉ. विनायक गाणबावले यांना मानले. सूत्रसंचालन प्रा. संजय सुतार यांनी केले.

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी

# नवीन शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षणावर जबाबदारी

## 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०'वर डिकेएएससमध्ये कार्यशाळा

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविण्याच्या उद्दिष्टाने लागू केलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आदर्श असेच आहे. या धोरणात उच्च शिक्षणावर फार मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे. पूर्वीच्या रचनेमध्ये बदल करण्यात आले असून विविध शाखांमधील पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहार, अनुभव, बहुआयामी व्यक्तिमत्त्व यांना महत्त्व आले आहे, असे मत डॉ. बी.एम. हिर्डेकर यांनी मांडले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित डी.के.ए.एस.सी. कॉलेज येथे नवे शिक्षण धोरण विषयावर विद्यापीठ स्तरीय एक दिवसीय कार्यशाळा झाली. महाविद्यालयाची या बाबतची समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : महाविद्यालये व शिक्षकांपुढील आव्हाने या विषयावर प्रमुख पाहुणे डॉ. बी.एम. हिर्डेकर बोलत होते.




नवे शिक्षण धोरण विषयावर बोलताना डॉ. बी.एम. हिर्डेकर

डॉ. हिर्डेकर म्हणाले, हे धोरण आखत असताना उच्च शिक्षणातील सद्य स्थिती आणि समस्यांचा सखोल विचार व्हायला हवा होता, तो झालेला नसल्यामुळे सदर धोरणाच्या अंमलबजावणीत अडचणी येऊ शकतात, या अडचणी आपण लक्षात आणून द्यायला हव्यात.

कार्यशाळेत अध्यक्ष पदावरून बोलताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील म्हणाले, नवे शिक्षण धोरण लागू झाले असून आता त्याच्या अंमलबजावणी शिवाय दुसरा पर्याय नाही. आमच्या महाविद्यालय स्तरावर आम्ही या धोरणाभिमुख राहून संस्थेच्या सहकार्याने उपक्रम राबवत राहू.

प्रास्ताविक डॉ. अर्जुन जाधव यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. अक्षय स्वामी यांनी करून दिला. प्र. प्राचार्या त्रिशला कदम यांची उपस्थिती लाभली. कार्यशाळेस महाविद्यालयाच्या सकाळच्या सत्राचे प्रमुख डॉ.डी. सी. कांबळे, दुपारच्या सत्राचे प्रमुख प्रा.डी.ए. यादव यांचे योगदान लाभले.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगीताई गावडे, सहसचिव प्रशासन प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. आभार डॉ.विनायक गणबावले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संजय सुतार यांनी केले.

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
9921600800

29-8-2022

सकाळ

बुधवार,
३१ ऑगस्ट २०२२



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा झाला.

## एएससी महाविद्यालय

इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा झाला. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. रोहित शिंगे यांनी मेजर ध्यानचंद यांच्याविषयी माहिती सांगितली. प्रा. मुजफ्फर लगीवाले यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
२ सप्टेंबर २०२२



इचलकरंजी : ग्लोबल यूथ ऑयकॉन पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. मधुमती शिंदे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील.

## डॉ. मधुमती शिंदे यांचा सत्कार

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापिका डॉ. मधुमती शिंदे यांना ग्लोबल यूथ आयकॉन पुरस्काराने सन्मानित केले. संशोधन आणि शिक्षण या विषयासाठी त्यांची पुरस्कारासाठी निवड केली. मलेशिया येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत झालेल्या सोहळ्यात हा पुरस्कार दिला. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते सत्कार केला. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. टी. इंगळे, प्रा. डी. ए. यादव, मेजर मोहन वीरकर, डॉ. आम्रपाली कट्टी, प्रा. आरती खोत, प्रा. ऊर्मिला चौगुले आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

शनिवार,
३ सप्टेंबर २०२२



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयामध्ये एनसीसी भरती झाली.

## एएससी महाविद्यालयात एनसीसी भरती

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात एनसीसी भरती प्रक्रिया झाली. ५६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कोल्हापूरचे कर्नल डी. एस. सायना, कर्नल वैजंत थोरात, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही भरती झाली. मुलांसाठी १ हजार ६०० मीटर रनिंग, सिट अप्स, पुशप, मुलाखत, लेखी परीक्षा व मुलींसाठी ८०० मीटर रनिंग, सिटअप्स, पुशप, लेखी परीक्षा व मुलाखतीवर झाली. २५० विद्यार्थी व १०० विद्यार्थिनी आल्या होत्या. त्यातून ८ विद्यार्थिनी व ११ विद्यार्थ्यांची निवड केली. सुभेदार मेजर राहुल बोकडे, सुभेदार डी. बी. नाईक, सुरेश अडसुळे, कैलास साबळे, बी. एच. एम. विक्रम सिंग आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार,
७ सप्टेंबर २०२२

# विविध उपक्रमांनी शिक्षक दिन.

**डिकेएएससी कॉलेज**

आयोजित कार्यक्रमात कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले. कॉमर्स विभागप्रमख प्रा. एच. बी. पाटील, प्रा. एन. एम. सावंत, प्रा. एम. एम. पाटील, प्रा. बी. सी. हिटनळ्ळी, प्रा. विजय निंबाळकर आदी उपस्थित होते. शिवम शेडगे याने प्रास्ताविक केले. प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

CS Scanned with CamScanner

महासत्ता ● शुक्रवार,९ सप्टेंबर २०२२



महाकर्ज मेळाव्याप्रसंगी दिपप्रज्वलन करताना उपस्थित मान्यवर.

# बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे महाकर्ज मेळावा संपन्न

इचलकरंजी, ता.८–

येथील बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यावतीने इचलकरंजी रोटरी क्लब येथे शनिवार ता.३ सप्टेंबर रोजी कर्जमेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास दत्ताजीराव कदम आर्टस्, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कोल्हापूर अंचल कार्यालयाच्या सीपीसी कमर्शियलच्या मुख्य प्रबंधक श्रीमती मोनाली हिवरकर यांनी ग्राहकांना बँकेच्या विविध कर्ज योजनांची माहिती दिली. सणांच्या या महिन्यांमध्ये बँकेने ग्राहकांमध्ये आनंद आणि उत्साह द्विगुणित करण्यासाठी गृह, वाहन व ३ लाखापर्यंतच्या सोने तारण कर्जावरील प्रक्रिया शुल्क माफ केल्याची माहिती यावेळी दिली. इचलकरंजी शाखेचे मुख्य प्रबंधक प्रथमेश चिटणीस यांच्या मार्गदर्शनाखाली हातकणंगले तालुक्यातील व जवळील शाखा प्रबंधकांनी मेळाव्याचे नियोजन केले होते. हातकणंगले शाखा प्रबंधक महेश पवार यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. या मेळाव्यामध्ये ग्राहकांना कर्ज मंजुरीपत्राचे वाटप करण्यात आले.

CS Scanned with CamScanner

दैनिक **महासत्ता** मंगळवार, ता.१३ सप्टेंबर २०२२

# प्राचार्य अनिल पाटील यांना पुरस्कार जाहीर

इचलकरंजी ता.१२-

येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अनिल पाटील यांना रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी चा नेशन बिल्डर अवॉर्ड २०२२ हा पुरस्कार जाहीर झाला आहे.



डॉ अनिल पाटील यांची श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत१९८७ साली प्राध्यापक म्हणून रुजू झाले.त्यांची राजे रामराव महाविद्याय,जत मध्ये त्यांनी प्रथम प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारला.इचलकरंजी येथील श्रीमती ए आर पाटील कन्या महाविद्यालय मध्ये ही त्यांनी काम केले आहे.आता ते दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयामध्ये कार्यरत आहेत.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत · शुक्रवार, १६ सप्टेंबर २०२२

# वाढदिनी इचलकरंजीतील युवतीने घेतला देहदानाचा निर्णय

## डीकेएएससी कॉलेजच्या वैभवी आढावची सामाजिक बांधिलकी : कुटुंबीयांनीही भरले अर्ज

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्समधील वैभवी आढाव या युवतीने वाढदिवसानिमित्त मरणोत्तर देहदानाचा निर्णय घेतला. तसेच याबाबतचा अर्ज मरुन वाढदिवसाला कृतीशील सामाजिक आयाम देत समाजाला संदेश दिला आहे.

हल्ली तरुणाई नेमकी कुठे जात आहे, असा समाजमनाला प्रश्न पडत असताना वैभवी आढाव या युवतीसारखे विवेकी युवक–युवती मात्र मरणोत्तर देहदान चळवळीत सहमागी होवून समाजोपयोगी उपक्रमात सहभाग घेऊन समाजात आदर्श घालून देत आहेत.

आपण हयात असताना सामाजिक देणं म्हणून आपण समाजसेवा. किंबहुना सामाजिक प्रबोधन करत राहिले पाहिजे. मात्र, त्याही पलीकडे जाऊन आपल्या मरणानंतरही आपला उपयोग समाजासाठी व्हावा, या सामाजिक बांधिलकीच्या हेतूने वैभवी आढाव या युवतीने मरणोत्तर देहदान करण्याचा निर्णय घेतला असल्याचे तिचे म्हणणे आहे. वैभवी ही डीकेएएससी इचलकरंजी कॉलेजच्या विवेकवाहिनीची कार्यकर्ती आहे.

सामाजिक भान राखून आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घेणारी अत्यल्प तरूण पिढी आज समाजात आहे. मात्र, वैभवीने हा निर्णय घेऊन आणि तिच्या समवयीन युवक–युवतींना अशा पद्धतीने सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन करत परिवर्तनशील पाऊल उचलले आहे. तिच्या या निर्णयाचे कुटुंबिय, नातेवाईक, मित्रपरिवार, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, राष्ट्र सेवा दल, छात्रभारती आणि विवेकवाहिनी या सामाजिक संघटनेकडूनही कौतुक होत आहे.



इचलकरंजी : वैभवी आढाव हिने वाढदिवसानिमित्त मरणोत्तर देहदानाचा निर्णय घेतला आहे. कुटुंबीयांसमवेत वैभवी.

विशेष बाब म्हणजे, देहदान या निर्णयाला वैभवीच्या पालकांचा केवळ पाठिंबाच नाही तर त्यांनीही त्यांच्या मुलीच्या निर्णयाचे अनुकरण करत स्वत:चेही मरणोत्तर देहदानाचे अर्जही भरले आहेत.

Scanned with CamScanner



इचलकरंजी : डी. के. ए. एस. सी. कॉलेजमध्ये हिंदी दिवस साजरा करण्यात आला, यावेळी शिक्षकवर्ग.

# डी.के.ए.एस.सी. कॉलेजमध्ये हिंदी दिवस उत्साहात

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्यावतीने हिंदी दिवस समारंभ साजरा करण्यात आला. यावेळी भित्तिपत्रिकेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. हिंदी सप्ताह उद्घाटनाची सुरूवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून नाइट कॉलेजचे प्रा. संतोष साळुंखे उपस्थित होते. त्यांनी हिंदी भाषा का महत्त्व कल आज और कल या विषयावर बोलताना हिंदी भाषेचे महत्त्व पटवून दिले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी हिंदीतील एक कविता सादर केली. प्रास्ताविक प्रा. अंजली उबाळे यांनी केले. आभार प्रा. अपर्णा कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ आणि प्रा. किशोरी टोणपे यांनी केले.

केसरी

9921600800

18-9-2022

सकाळ

सोमवार,
१९ सप्टेंबर २०२२




इचलकरंजी : डिकेएएसएसी महाविद्यालयाच्या 'विवेक' वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते केले.

# डिकेएएससीमध्ये वाङ्‌मय मंडळाचे उद्‌घाटन

इचलकरंजी, ता. १८ : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाने इचलकरंजीच्या जडणघडणीत शैक्षणिक सुविधा पुरवण्याबरोबरच सांस्कृतिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यातून अनेक प्रथितयश लेखक, कवी, पत्रकार, संपादक, नाट्यकलावंत घडले आहेत. कॉलेजचे भित्तीपत्रिका, 'विवेक' वार्षिक, काव्य संमेलन, सांस्कृतिक स्पर्धा, कार्यशाळा असे वाङ्मयीन उपक्रम अभिरुची संपन्न असतात, असे गौरवोद्‌गार समाजवादी प्रबोधिनीचे सरचिटणीस कवी प्रसाद कुलकर्णी यांनी काढले. महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळ उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. विद्यार्थ्यांचे लेखन आणि शैक्षणिक वर्षातील कामकाजांचे संस्मरणीय छायाचित्रांसह अहवाल असलेल्या 'विवेक' वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते केले. महाविद्यालयाच्या अद्ययावत संकेतस्थळाचेही अनावरण केले. कवी युवराज मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन झाले. विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता सादर केल्या.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत

सोमवार, १९ सप्टेंबर २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये हिंदी दिनानिमित्त भित्तीपत्रिकेच्या अनावरणप्रसंगी प्राचार्य डॉ. अनिल पाटील व मान्यवर.

# डीकेएएससी कॉलेजमध्ये भित्तीपत्रिकेचे अनावरण

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्यावतीने हिंदी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी भित्तीपत्रिकेचे अनावरण प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. नाईट कॉलेजचे प्रा. संतोष साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. अंजली उबाळे यांनी केले. आभार प्रा. अपर्णा कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ, प्रा. किशोरी टोणपे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
१९ सप्टेंबर २०२२

# 'एएससी'मध्ये भित्तीपत्रिकेचे उद्घाटन

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिन सप्ताहात साजरा करण्यात येत आहे. याअंतर्गत भित्तिपत्रिकेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. संतोष साळुंखे उपस्थित होते. त्यांनी 'हिंदी भाषा का महत्त्व: कल आज और कल' या विषयावर विद्यार्थ्यांना वैयक्तिक अनुभवातून हिंदी भाषेचे महत्त्व पटवून दिले. हिंदी भाषेतून मिळणाऱ्या रोजगाराच्या अनेकानेक संधींविषयी माहिती दिली. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे होते. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय हिंदी विभागाच्या प्रा. अंजली उबाळे यांनी करून दिला. आभार प्रा. अपर्णा कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ आणि प्रा. किशोरी टोणपे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

**सकाळ**

कोल्हापूर, सोमवार,
१९ सप्टेंबर २०२२

# 'डीकेएएससी'मध्ये ओझोन दिन



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात जागतिक ओझोन दिनानिमित्त पोस्टर मेकींग स्पर्धा झाल्या.**

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागामार्फत जागतिक ओझोन दिन साजरा केला. ओझोन म्हणजे काय, ओझोनचे थर, पर्यावरणीय बदलामुळे ओझोनच्या थरामध्ये छिद्रे होत असल्याची चर्चा, ओझोन थरावर होणारा परिणाम, ओझोनच्या थराचा बचाव, वाहनांमुळे होणारे परिणाम त्यावरील उपाययोजना आणि पर्यावरणाचे संरक्षण याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती, मार्गदर्शन करण्यासाठी पोस्टर मेकिंग स्पर्धा घेतली. यात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव, प्रा. चेतन पाटील यांनी परीक्षक म्हणून काम केले. डॉ. एन. एच. शेख, डॉ. आर. ए. सनदी, प्रा. एस. एस. शेख, प्रा. आरती पोवार, प्रा. एस. आर. पाटील आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. के. वाघमारे यांनी केले.

Scanned with CamScanner

# डी.के.ए.एस.सी.चे वाङ्मयीन उपक्रम अभिरुची संपन्न

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : येथील दत्ताजीराव कदम महाविद्यालयाचे भित्तिपत्रिका, मविवेकफ वार्षिक, काव्यसंमेलन, सांस्कृतिक स्पर्धा, कार्यशाळा असे वाङ्मयीन उपक्रम अभिरुची संपन्न असतात, असे गौरवोद्गार समाजवादी प्रबोधिनीचे सरचिटणीस, सुप्रसिद्ध कवी प्रसाद कुलकर्णी यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळ उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे लेखन आणि शैक्षणिक वर्षातील कामकाजांचे संस्मरणीय छायाचित्रांसह अहवाल असलेल्या 'विवेक' वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी कवी युवराज मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलनाचे आयोजन केले होते. प्रास्ताविक डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी केले, परिचय प्रा. संजय सुतार यांनी करुन दिला, तर सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले. नम्रता ताटे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव उपस्थित होते.

केसरी
9921600800
19-9-2022

तरुण भारत
मंगळवार, २० सप्टेंबर २०२२

# डीकेएएससीच्या प्राणीशास्त्र विभागांतर्गत जागतिक ओझोन दिन

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, प्राणीशास्त्र विभागांतर्गत जागतिक ओझोन दिन साजरा करण्यात आला. ओझोन म्हणजे काय? ओझोनचे थर? पर्यावरणीय बदलामुळे ओझोनच्या थरामध्ये छिद्रे होत असल्याची चर्चा, ओझोन थरावर याचा होणारा परिणाम, ओझोनच्या थराचा बचाव, पर्यावरण संरक्षण याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती, मार्गदर्शन करण्याकरिता पोस्टर मेकींग स्पर्धा घेण्यात आली. यात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. उद्‌घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. प्रा. डी. ए. यादव, प्रा. चेतन पाटील यांनी परीक्षक म्हणून कार्य केले. प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. के. वाघमारे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. ए. गारे, डॉ. एन. एच. शेख, डॉ. आर. ए. सनदी, एस. एस. शेख, ए. एस. पोवार, एस. आर. पाटील, शिक्षकेतर कर्मचारी तांबोळी, यादव यांचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

तरुण भारत
बुधवार, २१ सप्टेंबर २०२२

# डीकेएएससीचे वाङ्मयीन उपक्रम अभिरूचीसंपन्न

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम महाविद्यालयाने इचलकरंजीच्या जडणघडणीत शैक्षणिक सुविधा पुरविण्याबरोबरच सांस्कृतिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यातून अनेक प्रथितयश लेखक, कवी, पत्रकार, संपादक, नाट्यकलावंत घडले आहेत. कॉलेजचे भित्तिपत्रिका, 'विवेक'' वार्षिक, काव्यसंमेलन, सांस्कृतिक स्पर्धा, कार्यशाळा असे वाङ्मयीन उपक्रम अभिरूचीसंपन्न असतात, असे गौरवोद्गार समाजवादी प्रबोधिनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी यांनी काढले. महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळ उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. वाङ्मयीन उपक्रमांमधून घडणारे नवोदित, साहित्यिक समाजपरिवर्तनात व विकासात रचनात्मक योगदान देतील, असे मत प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी मांडले.

'विवेक'' वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उपक्रमात कवी युवराज मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलनाचे आयोजन केले होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी केले. परिचय प्रा. संजय सुतार यांनी करुन दिला. सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले. प्रा. नम्रता ताटे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

साप्ताहिक इचलकरंजी समाचार • गुरुवार २२-९-२०२२ •

# ए.एस.सी.महाविद्यालयाचे सांस्कृतिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान- कुलकर्णी

इचलकरंजी, दि. १७-दत्ताजीराव कदम ए.एस.सी महाविद्यालयाने इचलकरंजीच्या जडणघडणीत शैक्षणिक सुविधा पुरवण्याबरोबरच सांस्कृतिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यातून अनेक प्रथितयश लेखक, कवी, पत्रकार, संपादक, नाट्यकलावंत घडलेत, असे गौरवोद्गार समाजवादी प्रबोधिनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी यांनी काढले. महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळ उद्घाटन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी साहित्य हा समाजाचा आरसा असतो. आमच्या वाङ्मयीन उपक्रमांमधून घडणारे नवोदित साहित्यिक समाज परिवर्तनात व विकासात रचनात्मक योगदान देतील, असे सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे लेखन आणि शैक्षणिक वर्षातील कामकाजांच्या संस्मरणीय छायाचित्रांच्या विवेक या वार्षिक अंकाचे प्रकाशन तसेच महाविद्यालयाच्या अद्ययावत संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले.

कवी युवराज मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनात प्रा. अंजली उबाळे, अवंतिका खराडे, प्रियांका भाटले, प्रकाश डोंगरे यांच्यासह विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता सादर केल्या. प्रसाद कुलकर्णी यांनी गझला आणि युवराज मोहिते यांनी मुक्तछंदातील विविध आशयाच्या कविता, चारोळ्या सादर करून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास डॉ. डी.सी. कांबळे, प्रा. डी.ए. यादव, प्रा. डॉ. सुनिता वेल्हाळ, प्रा. संजय सुतार, प्रा. भारती कोळेकर, प्रा. नम्रता ताटे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

# डीकेएएससी कॉलेजमध्ये बिग बटरफ्लाय मंथ उत्साहात साजरा

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा:**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डीकेएससी कॉलेज मधील प्राणीशास्त्र विभागा अंतर्गत 'बिग बटरफ्लाय मंथ' निमित्ताने व्याख्यानचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते झाले.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी.के. वाघमारे यांनी करून दिली. प्रमुख पाहुणे व वक्ते डॉ. एस.आर. उमराणे यांनी Awareness and Conservation of beautiful winged wonders of the world या विषयावर व्याख्यान दिले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. रेश्मा सनदी यांनी केले व प्रा. डॉ. निलोफर शेख यांनी आभार मानले. या कार्यक्रमास स्टाफ सेक्रेटरी डी.ए. यादव उपस्थित होते.

# बलशाली भारत निर्मितीसाठी राष्ट्रीय सेवा योजना हाच एकमेव पर्याय-डॉ. पी.टी. माने

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा:**

बलशाली भारत निर्मितीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेसारखा दुसरा पर्याय नाही, असे प्रतिपादन डॉ. पी.टी. माने यांनी केले. योजनेच्या विविध उपक्रमातून श्रमप्रतिष्ठा, सेवा, त्याग, नैतिकता, चारित्र्य, नेतृत्व संघटन, चिंतनशिलता, कलात्मक प्रयोगशिलता आदी गुणांबरोबरच संविधानाप्रती आदर वाढीस लागतो असा मौलिक संदेश त्यांनी दिला.




श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित, दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन संपन्न झाला. यावेळी डॉ. माने बोलत होते.

प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने प्रारंभ झालेल्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. कार्यक्रमास सकाळ सत्राचे प्रमुख प्रा.डॉ. डी.सी. कांबळे, दुपार सत्राचे प्रमुख प्रा. डी. ए. यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. समारंभास राष्ट्रीय सेवा योजनाचे सदस्य प्रा. विशाल कांबळे व महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होते.

प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुण कटकोळे यांनी केले. आभार प्रा. डी.जे. मुंगारे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. पी.के. वाघमारे यांनी केले.

**सकाळ** मंगळवार, २७ सप्टेंबर २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. पी. टी. माने. व्यासपीठावर मान्यवर.

# राष्ट्रीय सेवा योजना दिनी राष्ट्रसेवेचा जागर

इचलकरंजी : देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडवण्यामध्ये प्रमुख भूमिका असणारा ५३ वा राष्ट्रीय सेवा योजना दिन विविध उपक्रमशील कार्यक्रमांनी झाला. महाविद्यालयीन युवाशक्तीला नवचेतना देण्याचे कार्य या दिनाच्या माध्यमातून करण्यात आले. स्वच्छतेसह व्याख्यानाद्वारे राष्ट्रीय सेवा योजना दिनाला राष्ट्रसेवेचा जागर करण्यात आला. माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी या ब्रीदवाक्याची जाणीव ठेवत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी समाजसेवा, स्वच्छतेची तत्परतेची शपथ घेतली. या दिनापासून गांधी जयंतीपर्यंत स्वच्छता सप्ताहाचेही आयोजन केले आहे.

CS Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार,
२७ सप्टेंबर २०२२

## डीकेएएससी महाविद्यालय

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांमधून श्रमप्रतिष्ठा, सेवा, त्याग, नैतिकता, चारित्र्य, नेतृत्व संघटन, चिंतनशीलता, कलात्मकता व प्रयोगशीलता आदी गुणांबरोबरच संविधानाप्रती आदर वाढीस लागतो. हेच उपक्रम राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करत देश बलशाली करण्याचे कार्य करतात. देश बलशाली करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनासारखा दुसरा पर्याय नाही, असे प्रतिपादन डॉ. पी. टी. माने यांनी केले. त्यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. उपप्राचार्य प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

Scanned with CamScanner

तरुण भारत
मंगळवार, २७ सप्टेंबर २०२२

# डीकेएएससीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिन

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिन झाला. विभागाचे उद्‌घाटन डॉ. पी. टी. माने यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. माने म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांमधून श्रमप्रतिष्ठा, सेवा, त्याग, नैतिकता, चारित्र्य, नेतृत्व संघटन, चिंतनशिलता, कलात्मकता व प्रयोगशीलता इ. गुणांबरोबरच संविधानाप्रती आदर वाढीस लागून राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करत देश बलशाली करावयाचे कार्य केले. देश बलशाली करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनासारखा दुसरा पर्याय नाही. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. प्रास्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुण कटकोळे यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. विशाल कांबळे, प्राध्यापक, उपस्थित होत्या. आभार प्रा. डी. जे. मुंगारे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. के. वाघमारे यांनी केले.

Scanned with CamScanner